# सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानतर्फे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास सुरक्षा उपकरणांची भेट


लातूर – दि. २२ मे, २०२०

कोविरो-१९ या रोगाच्या साथीचे सावट चांगलेच स्थिरावले असून रुग्णांच्या संख्येत मात्र वाढ होताना दिसते आहे. लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेच्या रुग्णालयातील ‘कोविरो-१९ विशेष रुग्णकक्षा’त दररोज सुमारे ४०० रुग्णांची तपासणी होत असून अडीचशे डॉक्टरांसह निवासी डॉक्टर्स, परिचारिका, निमवैद्यकीय व इतर कर्मचारी मिळून साडेसातशे जणांचा कर्मचारीवर्ग सेवा व शुश्रुषा पुरवत आहेत. अर्थातच त्याचा यंत्रणेवर प्रचंड ताण पडत असून विशेषत: रुग्णांची शुश्रुषा करणाऱ्या, वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना आवश्यक असलेल्या सुरक्षा उपकरणांचा व गणवेषाची नितांत व मोठ्या प्रमाणावर गरज भासते आहे. अशा परिस्थितीत अनेक स्वयंसेवी सामाजिक संस्था योगदान देत आहेत.

पानगाव (जि.लातूर) येथील सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेनेही याबाबतीत आपले योगदान सातत्याने नोंदवले असून, नुकतेच या प्रतिष्ठानतर्फे वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षा यंत्रणेचा तुटवडा लक्षात घेवून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेच्या रुग्णालयातील कोविरो-१९ रुग्णकक्षासाठी वैयक्तिक सुरक्षा उपकरणे व गणवेषाचे २० संच पुरवण्यात आले. याबाबतीत उपअधीक्षक डॉ. राहुल उंबरे व प्रा. मनोहर कबाडे यांनी पुढाकार घेवून या प्रदानाचे आयोजन केले. दि. २२ मे रोजी मा. अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांना हे २० संच प्रतिष्ठानतर्फे सचिव प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आले. याप्रसंगी, वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयाचे मुख्य अधीक्षक डॉ. संतोष डोपे, उप-अधिष्ठाता डॉ. मंगेश सेलूकर, नेत्रचिकित्सा विभागप्रमुख डॉ. उदय मोहिते, क्ष किरण व किरणोत्सर्ग चिकित्सा विभागप्रमुख डॉ. बालाजी कोंबडे उपस्थित होते.

सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानतर्फे यापूर्वीही अभिनव अशा मराठी गझल स्पर्धेच्या आयोजनातून पंतप्रधान व मुख्यमंत्री या दोन्ही निधीत पंधरा हजार रुपयांचे योगदान देण्यात आले आहे.








सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानतर्फे लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेस कोविरो-१९ कक्षासाठी अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांना सुरक्षा संचाची भेट देताना कार्यवाह प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी. छायाचित्रात सोबत समन्वयक प्रा. मनोहर कबाडे, मुख्य अधीक्षक डॉ. संतोष डोपे, उप-अधिष्ठाता डॉ. मंगेश सेलूकर, नेत्रचिकित्सा विभागप्रमुख डॉ. उदय मोहिते, क्ष किरण व किरणोत्सर्ग चिकित्सा विभागप्रमुख डॉ. बालाजी कोंबडे व उपअधीक्षक डॉ. राहुल उंबरे.